शिविम
मराठी

॥ सामर्थ्य मायमराठीचं ॥
॥ विकसन MY बोलीचं ॥

## शिवाजी विद्यापीठ मराठी शिक्षक संघ,कोल्हापूर

( स्थापना :दि.५ मे,२००८ नो.क्र.महा/२४९२९/को./११/०७/०८ )

अनुराज,७/ब,सुर्यवंशी कॉलनी अ,सानेगुरुजी वसाहत कोल्हापूर–४१६०११

आणि

## आर्टस् ॲण्ड कॉमर्स कॉलेज,नागठाणे

## ता.जि. सातारा– ४१५५१९

या संस्थातील

# सामंजस्य करार

# MEMORANDUM OF UNDERSTANDING

सप्टेंबर २०१९

भारतीय गैर न्यायिक

एक सौ रुपये Rs. 100

रु. 100 ONE HUNDRED RUPEES

सत्यमेव जयते

भारत INDIA

INDIA NON JUDICIAL

महाराष्ट्र MAHARASHTRA ◑ 2019 ◑ VK 558131

फक्त प्रतिज्ञापत्रासाठी (अनुच्छेद ४) / Only For Affidavit (Article 4)

प्रतिज्ञापत्र ज्यांचेकडे सादर करावयाचे (For Submitting to) करारनामा

प्रतिज्ञापत्रासाठी कारण (Reason for Affidavit)

मुद्रांक विकत घेणाऱ्याचे नाव व रहिवाशी पत्ता (Stamp Purchaser's Name Place of Residence) प्राचार्य आर्टस् अँन्ड कॉमर्स कॉलेज, नागठाणे ता.जि.सातारा

मुद्रांक विक्री नोंद वही अनु. क्रमांक / दिनांक (Serial No./Date) हे. ५स-५म- कांबळे १५३८७ 17 SEP 2019

मुद्रांक विकत घेणाऱ्याची सही (Stamp Purchaser's Signature)

परवानाधारक मुद्रांक विक्रेत्याची सही व परवाना क्रमांक

परवानाधारक मुद्रांक विक्रीचे ठिकाण / पत्ता

श्रीमती आशा सुनिल पांडेकर
परवाना क्र. २३०१०२९
मु. ठि. स. दु. नि. का. वर्ग २, सातारा १
पत्ता-५१२, करंज पेठ, सातारा

ज्या कारणासाठी ज्यांनी मुद्रांक खरेदी केला त्यांनी त्याच कारणासाठी मुद्रांक खरेदी केल्या पासून ६ महिन्यात वापरणे बंधनकारक आहे

TREASURY OFFICE SATARA
11 SEP 2019
STAMP HEAD CLERK

शिवाजी विद्यापीठ मराठी शिक्षक संघ,कोल्हापूर
आणि
आर्टस् ॲण्ड कॉमर्स कॉलेज,नागठाणे ता.जि. सातारा– ४१५५१९

शिवाजी विद्यापीठ मराठी शिक्षक संघ,कोल्हापूर हे विद्यापीठीय मराठी शिक्षक आणि

शिवाजी विद्यापीठ मराठी शिक्षक संघ • कोल्हापूर • स्थापना ५ मे २००८ नों.क्र. महा/२४९२९/ दि. ११/०७/२००८

महाराष्ट्रातील साहित्य आणि भाषाप्रेमी यांचे संघटन आहे.मराठीभाषा,साहित्य आणि संस्कृती यांचे संवर्धन आणि विकसन करणे तसेच संशोधन करणे हे संघाचे ध्येय आहे.मराठी शिक्षकांच्या दर्जेदार अध्यापनासाठी प्रसार आणि संशोधन या संदर्भात विविध उपक्रम राबविले जातात त्यानुसार विविध विषयांवर राष्ट्रीय चर्चासत्र,परिसंवाद,कार्यशाळेचे आयोजन केले जाते.विविध महाविद्यालयातील चर्चासत्रे तसेच कार्यशाळांमध्ये बौध्दीक सहयोगी होऊन सहकार्य केले जाते. विद्यार्थ्यांमध्ये मराठी भाषेचे आणि साहित्याचे विकसन करण्याच्या दृष्टिने निबंधलेखन,कथालेखन,काव्यलेखन,कथाकथन,काव्यवाचन अशा विविध स्पर्धांचे आयोजन केले जाते,तसेच मराठी प्राध्यापकांच्या शोधनिबंधाना पारितोषिक,ललित,ललितेतर,संपादीत ग्रंथाना पारितोषिक दिले जाते.संघामार्फत **'शिविम संशोधन पत्रिका** हे **विद्वताप्रमाणित'** Pear Reviewed Research Journal,त्रैमासिक प्रसिध्द केले जाते. त्याचा ISSN No.2319-6025 असून शिवाजी विद्यापीठ आणि यु.जी.सी. मान्यताप्राप्त यादीमध्ये पत्रिकेचा समावेश केलेला आहे.वरील नमूद केलेल्या शिवाजी विद्यापीठ मराठी शिक्षक संघ, आणि आर्टस् ॲण्ड कॉमर्स कॉलेज,नागठाणे ता.जि. सातारा —४१५५१९ या संस्था एकमेकांबरोबर सामंजस्य करार दि. **१९** सप्टेंबर २०१९ रोजी करत आहेत.या कराराची उध्दिष्टे खालीलप्रमाणे निश्चित करण्यात आलेली आहेत.

**उध्दिष्टे —**

१.मराठी भाषा,साहित्य आणि संस्कृती यांचे संवर्धन करणे आणि विविध विषयांवर संशोधन प्रकल्प राबविणे.

२.चर्चासत्र,कार्यशाळा,परिसंवाद,काव्यसंमेलन,साहित्यसंमेलन,संयुक्त बैठका यांचे आयोजन करणे.

३. विद्यापीठीय अभ्यासक्रम, प्रमाणपत्र,पद्विका कोर्ससाठी सहयोग व सहकार्य करणे.

४.निबंध,वक्तृत्व, वाद—विवाद,प्रश्नमंजुषा,कथालेखन,काव्यलेखन,कथाकथन,काव्यवाचन स्पर्धांचे आयोजन करणे.

५.स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्रासाठी सहकार्य करणे.

६. व्यक्तिमत्व विकास प्रकल्प, कौशल्य विकास प्रकल्प राबविणे.

७.दरवर्षी कोल्हापूर, सांगली,सातारा या शिवाजी विद्यापीठाच्या कार्यक्षेत्रामध्ये संघाचे वार्षिक एक/दोन दिवसाचे अधिवेशन विविध साहित्यिक विषयांवर घेणे. सदर अधिवेशनात प्राध्यापकांच्या शैक्षणिक तसेच विषयाच्या समस्यांवर चर्चा करणे.

८.सर्जनशील लेखन,उपयोजित मराठी लेखन प्रकल्प राबविणे.

९. मोडीलिपी,मुद्रितशोधन,पत्रकारिता इत्यादी अभ्यासक्रमांचे आयोजन करणे.

१०.ग्रंथ प्रकाशित करण्यासाठी सहकार्य करणे. ग्रंथाचे प्रकाशन व चर्चा घडवून आणणे.

११. मराठी भाषा,साहित्य आणि संस्कृती या संबधाने येणाऱ्या समस्या व अडचणी विद्यापीठ,शासन आणि विद्यापीठ अनुदान आयोग,यांना या संदर्भात सूचना — पत्रव्यवहार करणे.

**एकमेकांना सहाय्य करण्याची प्रस्तावित माध्यमे–**

१. परस्पर हिताच्या शैक्षणिक बाबींमध्ये तसेच प्रशिक्षणामध्ये सहकार्य करणे.
२. विविध उपक्रमाचे आयोजन करण्यासाठी परस्परांशी सहकार्य करणे.
३. उपलब्ध साधनसामुग्रीनुसार या संस्थाकडून एक निश्चित योजना तयार करणे.
४. त्रैमासिकाव्दारे साहित्य, विचार यांची देवाणघेवाण करणे.
५. दरवर्षी संघाचे अधिवेशन विविध कॉलेजवर आयोजित करून विचारविनीमय करणे.
६. शासन, साहित्य अकादमी,मराठी साहित्य व संस्कृती महामंडळ,राज्य मराठी विकास संस्था यांचे उपक्रम सौजन्याने राबविणे.

**अटी–**

१. आपआपल्या खर्चाने एकमेकांना सहकार्य करणे.
२. परस्पर सामंजस्य करारातील उदाहरणांचे नुतनीकरण करणे आणि परस्परांच्या लेखी करारांची कोणत्याही क्षणी समाप्ती केली जाऊ शकते. साठ दिवसांच्या पूर्व लेखी सूचनेनुसार दोन्हीपैकी कोणत्याही संस्थेला करार संपुष्टात आणता येईल.
३. कोणत्याही महाविद्यालयास प्रवास व भोजन भत्ता देणे बंधनकारक नाही.
४. सदर परस्पर सामंजस्य कराराचा कालावधी पाच वर्षानंतर संपुष्टात येईल.
५. परस्पर सहमतीने आणखी पाच वर्षासाठी हा करार पुढे चालू ठेवता येईल.
६. यासाठी निश्चित दिनांक व लेखी अनुमती यांची आवश्यकता बंधनकारक असेल.

**समन्वय –**

१. सदर कराराची जबाबदारी, समन्वय आणि अंमलबजावणीसाठी शिक्षक संघाचे अध्यक्ष,उपाध्यक्ष, सचिव कार्यरत राहतील. तसेच महाविद्यालयाचे प्राचार्य,विभागप्रमुख आणि समन्वयक काम करतील.
२. सदर सामंजस्य करार कायदेशीर भाषेमध्ये तसेच कायदेशीर अटीशी अधीन राहून दोन प्रतीमध्ये अंमलात येत आहे.
३. खालील स्वाक्षऱ्यांचा सदरहू परस्पर सामंजस्य करार हा पुढील समन्वयिक अधिकाऱ्यांत होत आहे,तसेच वर नमूद केलेल्या दिनांक व वर्षानुसार अंमलात येत आहे.

| प्रा.सुंदर एम.कांबळे | डॉ. जे.एस.पाटील | डॉ प्रकाश दुकळे | डॉ. शिवकुमार सोनाळकर |
|---|---|---|---|
| विभाग प्रमुख | प्राचार्य | सचिव | अध्यक्ष |

Head, Department of Marathi
Arts and Commerce College, Nagthane

प्राचार्य
आर्टस् ॲण्ड कॉमर्स कॉलेज, नागठाणे, ता. व जि. सातारा

शिवाजी विद्यापीठ मराठी शिक्षक संघ,कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठ मराठी शिक्षक संघ • कोल्हापूर • स्थापना ५ मे २००८